# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**महत्वाचे**

क्रमांक :-विकाअ/शिक्षण/रॅगिंग/२०१५/ 3037

दिनांक - 7 DEC 2015

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित

पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी अँटी रॅगिंग/अँटी कॅपीटेशन फी/तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/रॅगिंग/२०१५/१८९४ दिनांक ३०/११/२०१५.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासन पत्र क्रमांक संकीर्ण - १०९८/१३३/९८ विशी-३, दि. २७ मे १९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि. ०१ जून १९९९ पासून अमलात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत एम.बी.ए./एम.एम.एस., एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी तसेच अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेन्ट अँड कॅटरींग टेक्नालॉजी पदवी / पदविका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या सर्व शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापिठ व्यवस्थापित, विद्यापिठ विभाग तसेच विनाअनुदानित संस्थांच्या प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात, क्लासमध्ये, कॅटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याबाबत तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करुन त्यांना अधिनियमासंबंधी सूचना देण्यात याव्यात आणि रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. जर रॅगिंग प्रकरण घडल्यास सबंधीत संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्याबाबत संस्थाच्या प्राचार्यांना / संचालकांना कळविण्यात येत आहे.

१) प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.

२) त्यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषतः हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.

३) संस्थेच्या माहिती पुस्तिकेत याचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडून संबंधीत विद्यार्थी रॅगिंगपासून दुर राहिल असे प्रतिज्ञापत्र साध्या पेपरवर भरुन घ्यावे. (शासनाच्या धोरणानुसार प्रतिज्ञापत्रसाठी स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही या बाबींची विशेषत्वाने नोंद घ्यावी)

४) वर्षातून एकदा, संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातून माहिती दयावी.

त्याचप्रमाणे संस्थांनी अँटी कॅपिटेशन ॲक्टमधील सर्व तरतूदी बंधनकारक असून त्याचे उल्लघन करणा-या संस्थावर कारवाई करण्यात यईल, याची नोंद घ्यावी.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये Womens Redresal Cell (महिला तक्रार निवारण समिती) स्थापन करणे व त्याची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तिकेत व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे अनिवार्य आहे, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.